13 JAN 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठास मिळणार 'सुवर्णमहोत्सव'तील ३५ कोटी

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही; पालकमंत्री हसन मुश्रीफ यांची मागणी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाला लवकरच ३५ कोटी रुपये निधी मिळणार आहेत. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या आग्रही मागणीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ही ग्वाही दिली. त्यांनी तातडीने वित्त विभागाच्या मुख्य सचिवांना सूचना दिल्या. येत्या अर्थसंकल्पात हा निधी समाविष्ट करण्यास सांगितले.

पुणे येथे उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि पुणे विभागातील पाच जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा नियोजन समित्यांची राज्यस्तरीय आढावा बैठक झाली. त्यावेळी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी निधीची मागणी केली.




कोल्हापूर : पुणे येथे झालेल्या जिल्हा नियोजन समित्यांच्या राज्यस्तरीय आढावा बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिवाजी विद्यापीठातील सुवर्णमहोत्सवी निधीतील ३५ कोटी लवकरच दिले जातील, असे सांगितले. यावेळी पालकमंत्री हसन मुश्रीफ, आदी उपस्थित होते.

विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त सन २०१४-१५ मध्ये विविध शैक्षणिक उपक्रमांसाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी ५० कोटी रुपये निधी देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार तो निधी मंजूरही झाला आहे. त्यानंतर कोविडसह अन्य कारणांमुळे निधी मिळण्यास विलंब झाला. मंजूर ५० कोटींमधील १६ कोटी १० लाख रुपये आतापर्यंत विद्यापीठाला मिळाले आहेत. उर्वरित निधी लवकर मिळावा, अशी मागणी पालकमंत्री मुश्रीफ यांनी केली होती. त्याबाबतचा पाठपुरावा विद्यापीठाच्या अधिसभेचे माजी सदस्य प्रताप माने, प्रा. मधुकर पाटील यांनी केला.

### या उपक्रमांना मिळणार गती



- या निधीमधून स्कूल आपण नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या मुख्य इमारतीसह मुलांचे वसतीगृह, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, राजर्षी छत्रपती शाहू रिसर्च सेंटर अँड म्युझियम कॉम्प्लेक्स, कन्वेंशन सेंटर, युवा विकास केंद्र, गोल्डन ज्युबिली फॅकल्टी हाऊस, लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या कामांना गती मिळणार आहे.

13 JAN 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाला मिळणार ३५ कोटी निधी

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची पुण्यात ग्वाही

## पालकमंत्री हसन मुश्रीफ यांची आग्रही मागणी



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाला लवकरच ३५ कोटी रुपये निधी मिळणार आहे. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या आग्रही मागणीवर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी ही ग्वाही दिली.

पुणे येथे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली व पुणे विभागातील पाच जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा नियोजन समित्यांची राज्यस्तरीय आढावा बैठक झाली. या बैठकीत मंत्री मुश्रीफ यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे ही मागणी केली. पवार यांनी तातडीने वित्त विभागाच्या मुख्य सचिवांना सूचना दिल्या आणि येत्या अर्थसंकल्पात हा निधी समाविष्ट करण्याचेही सांगितले.

याबाबत अधिक माहिती अशी, सन २०१४-१५ या विद्यापीठाच्या शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त विविध शैक्षणिक उपक्रमांसाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री अजितदादा पवार यांनी ५० कोटी रुपये निधी देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार तो निधी मंजुरीही झाला आहे. त्यानंतर कोविडसह अन्य कारणांमुळे निधी मिळण्यास विलंब झाला. मंजूर ५० कोटींमधील १६ कोटी, दहा लाख रुपये आत्तापर्यंत मिळालेले आहेत. उर्वरित निधी लवकर मिळावा, अशी मागणी वैद्यकीय शिक्षण विशेष कार्यमंत्री हसन मुश्रीफ यांनी केली होती. याबाबतची मागणी आणि पाठपुरावा केडीसीसी बँकेचे संचालक व शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेचे माजी सदस्य प्रताप उर्फ भैया माने, शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेचे माजी सदस्य प्रा. मधुकर पाटील यांनी केला होता.

### या उपक्रमांना मिळणार निधी...!

या निधीमधून स्कूल आपण नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या मुख्य इमारतीसह मुलांचे वसतिगृह, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, राजर्षी छत्रपती शाहू रिसर्च सेंटर अँड म्युझियम कॉम्प्लेक्स, कन्व्हेंशन सेंटर, युवा विकास केंद्र, गोल्डन ज्युबिली फॅकल्टी हाऊस, लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन ही कामे होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
13 JAN 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाला लवकरच ३५ कोटींचा निधी : अजित पवार

## पुण्यातील बैठकीत दिली ग्वाही

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या आग्रही मागणीनंतर शिवाजी विद्यापीठाला लवकरच ३५ कोटींचा निधी देण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे येथील बैठकीत दिली.

उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली पुणे विभागातील पाच जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा नियोजन समितीची आढावा बैठक झाली. या बैठकीत उपमुख्यमंत्री पवार यांनी तातडीने पान ९ वर

## 'या' उपक्रमांना मिळणार निधी

मिळणाऱ्या निधीमधून स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या मुख्य इमारतीसह मुलांचे वसतिगृह, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, राजर्षी छत्रपती शाहू रिसर्च सेंटर अँड म्युझियम कॉम्प्लेक्स, कन्व्हेन्शन सेंटर, युवा विकास केंद्र, गोल्डन ज्युबिली फॅकल्टी हाऊस, लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन ही कामे होणार आहेत.

# शिवाजी विद्यापीठाला लवकरच ३५ कोटींचा निधी : अजित पवार

(पान १ वरून) येत्या अर्थसंकल्पात हा निधी समाविष्ट करण्याबाबत वित्त विभागाच्या मुख्य सचिवांना सूचना दिल्या. २०१४-१५ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त विविध शैक्षणिक उपक्रमांकरिता उपमुख्यमंत्री पवार यांनी ५० कोटींचा निधी देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार निधी मंजूरही करण्यात आला. परंतु, कोरोना तसेच अन्य कारणांमुळे निधी मिळण्यास विलंब झाला. मंजूर ५० कोटींमधील १६ कोटी १० लाख रुपये आतापर्यंत प्राप्त झाले आहेत. उर्वरित निधी लवकर मिळावा, अशी मागणी वैद्यकीय शिक्षणमंत्री मुश्रीफ यांनी केली होती. याबाबत शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेचे माजी सदस्य व जिल्हा बँकेचे संचालक भय्या माने तसेच अधिसभेचे माजी सदस्य प्रा. मधुकर पाटील यांनी पाठपुरावा केला होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2024
सकाळ

## शिवाजी विद्यापीठ

मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, रसायनशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. कैलास सोनावणे, डॉ. प्रशांत अनभुले, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. उदय पाटील, डॉ. इराण्णा उचडण, डॉ. अमृता मांजरेकर, डॉ. एन. जे. वलेकर, डॉ. पी. बी. पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2024
तरुण भारत

# एमबीए अभ्यासक्रमासाठी नावनोंदणी करा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या वतीने पारंपारिक अभ्यासक्रमांबरोबर एम.बी.ए.अभ्यासक्रम लवकरच सुरु करण्यात येणार आहे, तरी या अभ्यासक्रमासाटी ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे. लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीमद्वारे विषय तज्ज्ञांनी विकसित व्हीडीओ लेक्चर्स, बुक्स लाईव्ह कॉन्सलिंगसेशन, डिस्कशन फोरम, प्रक्टीस टेस्टच्या माध्यमातून संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2024
लोकमत

# 'परीक्षेचे बदलते स्वरूप'वर कार्यशाळा

गडहिंग्लज : शिवराज महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हलकर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्पर्धा परीक्षेचे बदलते स्वरूप' या विषयावर कार्यशाळा पार पडली.

अध्यक्षस्थानी प्राचार्य संभाजी कदम होते. उपाध्यक्ष दिग्विजय कुराडे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. बिनादेवी कुराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धा परीक्षेचे तज्ज्ञ मार्गदर्शक के. ए. जोशी यांनी 'स्पर्धा परीक्षा आणि अभ्यासाच्या दिशा' याविषयी, तर अमेय सबनीस यांनी 'स्पर्धा परीक्षेचे बदलते स्वरूप' याविषयी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2024
पुण्यनगरी

# वि.स.खांडेकर यांची जयंती उत्साहात

कोल्हापूर : मराठी साहित्यास भारतीय ज्ञानपीठाचे पहिले पारितोषिक मिळवून देणारे साहित्यिक वि. स. खांडेकर यांची १२६ वी जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. जयंती दिनाचे औचित्य साधून वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सापले, प्रा. दत्तात्रय मचाले, उदयसिंह राजेयादव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2024
पुण्यनगरी

# लघुपट स्पर्धेत यशाबद्दल शहा बंधूंचा सत्कार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन संचलित शॉर्टफिल्म मेकिंग कोर्सचे विद्यार्थी प्रेषित शहा आणि पार्षद शहा यांच्या 'प्लास्टिक ब्लॉक' या शॉर्टफिल्मला गार्डन क्लबतर्फे आयोजित फेस्टीव्हलमध्ये दुसरा क्रमांक मिळाला. याबद्दल शहा बंधूंचा पत्रकारिता अध्यासनात सत्कार करण्यात आला. सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाची बॅच नुकतीच बाहेर पडली आहे. पहिल्या बॅचच्या शहा बंधूंच्या शॉर्टफिल्मला मिळालेले बक्षीस या अभ्यासक्रमाचे फलित आहे, अशी प्रतिक्रिया अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी व्यक्त केली. शहा बंधूंना सहयोगी शिक्षक विराज चव्हाण यांच्या हस्ते गौरवण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2024
पुण्यनगरी

# एकांकिका स्पर्धेमध्ये ऋतुजा बडवेचे यश

कोल्हापूर : पाचगाव येथील संगीतसूर्य कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि रंगकर्मी हेल्थ फौन्डेशनतर्फे संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह येथे श्री राजर्षी करंडक राज्यस्तरीय खुल्या एकांकिका स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संगीत आणि नाट्यशास्त्र विभागाची विद्यार्थिनी ऋतुजा बडवे हिला 'पार्टनर्स' या एकांकिकेतील अभिनयासाठी वैयक्तिक अभिनयाचे पारितोषिक प्राप्त झाले. तिला संगीत आणि नाट्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख आणि शिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2024

पुण्यनगरी

# पत्रकारितेवर १६ रोजी वक्तृत्व स्पर्धा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे मराठी पत्रकार दिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी दि. १६ जानेवारी रोजी वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. अध्यासनाच्या इमारतीत सकाळी साडेदहा वाजता स्पर्धेला सुरूवात होईल. स्पर्धेसाठी लोकशाही मूल्ये आणि पत्रकारिता, अर्थकारणाचा पत्रकारितेवरील प्रभाव, पत्रकारितेची सद्यस्थिती आणि भवितव्य हे तीन विषय निश्चित केले आहेत. स्पर्धेसाठी पाच मिनिटे वेळ दिला जाईल. याशिवाय दोन मिनिटांचा आणखी असे एकूण सात मिनिटांचा वेळ असेल. या स्पर्धेत केवळ पत्रकारितेचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. स्पर्धेत विद्यापीठातील तसेच विविध महाविद्यालयात सुरू असलेल्या पत्रकारिता विभागातील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर
13 JAN 2024
लोकमत

# अनुभवाधारित बहुपीक मॉडेल काळाची गरज : भांगे

कोल्हापूर : स्थानिक गरजा आणि अनुभवाधारित बहुपीक मॉडेल ही काळाची गरज आहे, असे मत गोरक्षनाथ भांगे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण अध्यासनात 'ग्रामविकासातील यशस्वी प्रयोग' विषयावर चर्चासत्रात ते बोलत होते.

अर्थशास्त्र अधिविभागाच्या सेमिनार हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ . व्ही. एन. शिंदे हे होते. वसंत वासकर यांनी 'मधाचे गाव-पाटगाव मॉडेल' याबाबत मधुमक्षिका पालन व मध संकलन याचे प्रात्यक्षिक दाखवून या प्रकल्पाची माहीती दिली.

डॉ. उर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. उमेश गडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2024
तरुण भारत

# बहु पीक मॉडेल काळाची गरज

- गोरक्षनाथ भांगे यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर :** स्थानिक गरजा आणि अनुभवाधारित बहु पीक मॉडेल ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन गोरक्षनाथ भांगे यांनी व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण अध्यासन, शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित 'ग्रामविकासातील यशस्वी प्रयोग' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभागाच्या सेमिनार हॉलमध्ये हा कार्यक्रम झाला. 'आरोग्यदायी स्वयं पोशी ३ गुंठा ७५ पिके शेती प्रयोग' या विषयांतर्गत सद्यस्थितीत शेती संवर्धनाची गरज व अन्न सुरक्षेच्या उणिवा विद्यार्थ्यांसमोर मांडल्या. वसंत वासकर यांनी 'मधाचे गाव- पाटगाव मॉडेल' याबाबत मधुमक्षिका पालन व मध संकलन याचे प्रात्यक्षिक दाखवले. प्रा. डॉ. उर्मिला दशवंत यांनी सुत्रसंचलन केले. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. उमेश गडेकर यांनी आभार मानले.